# महाराष्ट्र शासन
## महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य ), पुणे
दूसरा व तिसरा मजला , नवीन प्रशासकीय इमारत , विधानभवन समोर, कॅम्प, पुणे
दूरध्वनी क्र. ०२०-२६१३७११ Web site: https://mahabhumi.gov.in


---

जा.क्र./तलाठी भरती/प्र.क्र/८९७/२०२३ दि. १६/०८/२०२३

**-प्रसिध्दीपत्रक-**

**विषय:-** महसूल विभागातील गट क संवर्गातील तलाठी भरती सन २०२३.
लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्या वेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देणेबाबत.

या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. जा.क्र./तलाठी भरती/प्र.क्र./१०९/२०२३ दि. ०७/०७/२०२३ अन्वये सर्व उपायुक्त महसूल, सर्व जिल्हाधिकारी, सर्व तहसिलदार यांना तसेच या कार्यालयामार्फत पाठविणेत आलेले दिव्यांग अर्जदारांचे अर्ज यांना सोयी सवलती देणेबाबतचे प्रस्तावाबाबत शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१९/प्र.क्र. २००/ दि.क. २ दिनांक ०५ ऑक्टोबर २०२१ अन्वये आपले स्तरावर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविणेत आलेले होते. त्यानुसार काही जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिव्यांग अर्जदार यांनी मागणी केल्या नुसार त्यांना भरपाई वेळ अथवा लेखनिक याबाबत मंजुरी दिलेली आहे. परंतु दिनांक ११/०८/२०२३ रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरसिंगमध्ये बहुतेक निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दिव्यांगांसंबंधी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शन मागितले होते. त्यानुसार या कार्यालयामार्फत दिव्यांब बाबतीत उक्त शासन निर्णयानुसार दिव्यांग उमेदवार यांचे योग्य ते कागदपत्र तपासून व अर्जदार यांची पडताळणी करून भरपाई वेळ / लेखनिक देणेबाबतची कार्यवाही करावी असे सांगितले होते.

तरी याव्दारे पुनश्च: कळविणेत येते की, ज्या परीक्षा केंद्रावर दिव्यांग अर्जदार यांची परीक्षा आहे त्या ठिकाणी आपलेमार्फत नेमणेत आलेले केंद्र निरीक्षक (Observer) यांनी दिव्यांग उमेदवार यांना परीक्षा केंद्राच्या ठिकाणीच कागदपत्राची तसेच अर्जदारांची पडताळणी करून भरपाई वेळ अथवा लेखनिक देणेबाबत मंजुरी देण्याची कार्यवाही करावी. दिव्यांगांना परीक्षा केंद्राच्या ठिकाणी सुविधा देणेबाबतची कार्यवाही प्रथम प्राधान्याने करणेत यावी. याबाबत कोणतीही तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी. जिल्हाधिकारी यांनी सर्व केंद्र निरीक्षक (Observer) यांना उक्त शासन निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत सूचना देणेत याव्यात.

**स्वाक्षरी/- xxx**
**(आनंद रायते )** (भा.प्र.से)
**अपर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्तसंचालक**
**भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे**

**प्रति,**

सर्व उपायुक्त (महसूल),
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व तहसिलदार